**-:प्रेसनोट:-**

## वनक्षेत्र सहायक कार्यालय, भद्रावती येथील वनपाल व वनरक्षक, यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूरची कारवाई

वनक्षेत्र सहायक कार्यालय, भद्रावती येथील वनपाल श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत व वनरक्षक श्री. संदिप पुंडलिक पारवे यांनी तक्रारदाराच्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर अवैधरित्या रेती भरून वाहतुक केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईचे कागदपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे पाठविण्याकरीता २०,०००/- रू लाच रक्कमेची मागणी करून खाजगी इसम श्री. ललीत दिलीप नागपूरे, रा. भद्रावती याचे मार्फतीने स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांचे पथकाने आज दि. २७/०७/२०२६ रोजी कार्यवाही केली.

दिनांक ०७/०७/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांचे घराचे कामाकरीता त्यांचे ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये रेती भरून वाहतुक करीत असतांना रात्री ११/४५ वा. दरम्यान आरोपी श्री. कोमल घुगलोत (वनपाल) व आरोपी श्री. संदीप पारवे (वनरक्षक), वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती, जि. चंद्रपूर यांनी त्यांचे ट्रॅक्टर थांबवुन सदर ट्रॅक्टर ट्रॉलीसह वनक्षेत्र सहायक कार्यालय भद्रावती येथे घेऊन गेले. तक्रारदाराचे ट्रॅक्टर ट्रॉलीवर अवैधरीत्या रेती भरून वाहतूक केल्याबाबत केलेल्या कारवाईचे कागदपत्र वनपरिक्षेत्र कार्यालय येथे पाठविण्याचे कामाकरिता आरोपी श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वय ४२ वर्ष, पद- वनपाल व आरोपी श्री. संदिप पुंडलिक पारवे, वय ३९ वर्ष, पद - वनरक्षक, दोन्ही वनक्षेत्र सहायक कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर यांनी तक्रारदारास २०,०००/- रू लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना दोन्ही आरोपींना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २३/०७/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन तक्रार दिली.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवरून दिनाक २७/०७/२०२६ रोजी आरोपी श्री. कोमल नरसिंगराव घुगलोत, वय ४२ वर्ष, पद- वनपाल व आरोपी श्री. संदिप पुंडलिक पारवे, वय ३९ वर्ष, पद - वनरक्षक दोन्ही वनक्षेत्र सहायक कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर यांची पंचासमक्ष पडताळणी व सापळा कारवाई केली असता त्यांनी तक्रारदार यांचे ट्रॅक्टर ट्रॉलीवर अवैधरित्या रेती भरून वाहतुक केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईचे कागदपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे पाठविण्याकरीता २०,०००/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून खाजगी इसम श्री. ललीत दिलीप नागपूरे, रा. भद्रावती, जि. चंद्रपूर यांचे मार्फतीने स्विकारल्याने तिन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, श्रीमती माधुरी बावीस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक प्रशांत केदार व सापळा पथक पो.हवा. हिवराज नेवारे, रविकांत इंगळे, पो.शि. अमोल सिडाम, राकेश जांभुळकर, प्रदिप ताडाम, सचिन गजभिये, महेश माहुरपवार, म.पो.शि. मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर व चापोशि/संदिप कौरासे, मो.प.वि. चंद्रपूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर

| | | |
|---|---|---|
| श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर | :- | ९८२३२७०५८१ |
| श्री. प्रशांत केदार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर | :- | ८७८८७२३७६५ |

**Toll Free No. 1064 Phone No. : 07172-250251 Mob. No. 8379951064**
**Email: acbchandrapur@gmail.com Website: www.acbmaharashtra.gov.in**

( अनिल जिट्टावार )
पोलीसउपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर